# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब-क्षेत्रिय कार्यालय, एल्प्रो कंपनी परिसर, लिंक रोड, चिंचवडगांव, पुणे-३३.

(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)

Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in

दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३

जा.क्र.बक्षेका/ सभा/२ /कावि/ ५९/२०१८ दिनांक -२०/०४/२०१८

मा. श्री./श्रीमती------------------------------------------,

प्रभाग क्र.--------------------------------------------,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी – ४११ ०१८.

विषय : ब प्रभाग समितीची विशेष सभा दि. २६/०४/२०१८
रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित केलेबाबत
स्वीकृत सदस्य निवडीबाबत .

महोदय/महोदया,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ अन्वये प्रभाग समित्यांमध्ये बिनसरकारी संघटना व समाजलक्षी संघटना यांचे प्रतिनिधी नेमणुक करण्याची तरतुद आहे. तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील अधिसुचना १ जुलै २००० नुसार महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती (प्रभाग समित्यांमध्ये बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटना यांचे प्रतिनिधी घेण्यासाठी निकष) नियम २००० लागु केले आहेत.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रभाग समित्यांमध्ये बिनसरकारी संघटना आणि समाजलक्षी संघटना यांचे प्रतिनिधी घेण्यासाठी (प्रभाग समिती अंतर्गत तीन स्वीकृत सदस्य) पत्र क्र.बक्षेका/सभा/कावि/३३/२०१८, दि.२७/३/२०१८ नुसार दै.पुढारी, दै.सामना व दै.नवभारत मध्ये जाहीरात क्रमांक १२१०/२०१७-२०१८ अन्वयें जाहीर प्रकटन प्रसिध्द करुन दि.२८/३/२०१८ तें १०/४/२०१८ अखेर सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत तसेच दिनांक ११/४/२०१८ सकाळी ११.०० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र (अर्ज) मागविण्यात आले होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभागांतर्गत उपरोक्त प्रमाणेचे नियम तरतुदी व जाहीर प्रकटननुसार स्वीकृत सदस्य निवडीकरीता ब क्षेत्रीय कार्यालयामध्ये बिन सरकारी संघटना व समाजलक्षी संघटना यांचे सदस्यांमधून दि.२८/०३/२०१८ ते ११/०४/२०१८ पर्यंत कार्यालयीन कामाचे दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत या कालावधीमध्ये एकूण २९ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्रे दाखल केलेली आहेत. त्यापैकी छाननीमध्ये २७ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले असून ०२ अर्ज अवैध ठरले आहेत. सदर वैध व अवैध उमेदवारांची यादी अवैधतेच्या कारणांसह दि.१३/०४/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येवून जाहीर प्रकटनानुसार नामनिर्देशनपत्राच्या अवैधतेबाबतच्या कारणासह क्षेत्रीय अधिका-याच्या निर्णयावर आक्षेप असल्यास दिनांक १७/०४/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत आक्षेप अर्ज मागविणेत आले होते.

(कृ.मा.पहा)

त्यानुसार दोन अवैध नामनिर्देशनपत्रधाकांपैकी कोणत्याही अवैध नामनिर्देशनपत्रधारकांनी (उमेदवारांनी) दि.१७/०४/२०१८ रोजी दु. ३.०० वाजेपर्यत कागदपत्रासह आक्षेप अर्ज दाखल केले नाहीत. त्याप्रमाणे जाहीर प्रकटननुसार दिनांक १७/०४/२०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे नोटीस बोर्डवर एकूण २७ (सत्तावीस) वैध नामनिर्देशनपत्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत यादीप्रमाणे २७ (सत्तावीस) वैध ठरलेल्या (नामनिर्देशनपत्र) उमेदवारांमधून तीन नामनिर्देशित सदस्यांची निवड ब प्रभाग समितीमध्ये करणेकरीता दि.२६/०४/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये विशेष सभा आयोजित केली आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू

20.4.18

**प्रशासन अधिकारी तथा**
**सचिव (सभाशाखा)**
**ब प्रभाग समिती**

सोबत :- विशेष सभेची कार्यपत्रीका व वैध उमेदवारांची यादी सोबत जोडली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८

ब प्रभाग समिती सभा

कार्यपत्रिका क्र. १०

दि. २६/०४/२०१८ वेळ : दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची विशेष सभा गुरूवार, दिनांक २६/०४/२०१८ रोजी दु. १२.०० वा. ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील प्रमाणे कामकाज होईल.

विषय क्रमांक १ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीमध्ये वैध ठरलेल्या नामनिर्देशनपत्रामधून तीन नामनिर्देशित (स्वीकृत) सदस्यांची निवड करणे.

20.4.18

**प्रशासन अधिकारी तथा सचिव**
**ब क्षेत्रीय समिती, चिंचवड पुणे ३३**